दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार , दि. १३ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शुक्रवार दि. १३ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, दशमी (अहोरात्र) तिथी, दिवस नक्षत्र–पूर्वाषाढा रात्री ३-०३, योग– व्यतिपात सकाळी १०-३२
चंद्र रास- धनु, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

### गॅसच्या नावाखाली लुटालूट!

**पुणे**: आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा फटका सामान्य नागरिकांसह हॉटेल व्यावसायिकांना बसत असतानाच, काही वितरकांनी याचा मोठा काळाबाजार सुरू केला आहे. अधिकृतपणे पुरवठा ठप्प असल्याचे सांगून, पडद्यामागून १७०० रुपयांचे व्यावसायिक सिलिंडर चक्क अडीच ते तीन हजार रुपयांना विकले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

## सारांश वृत्त

### लाच प्रकरणी महसूल अधिकाऱ्यांना अटक

**जयपूर** : राजस्थान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी जयपूरमध्ये दोन महसूल अधिकाऱ्यांना ३०,००० रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बस्सी तहसीलमधील खेडी ग्रामपंचायतीमध्ये तैनात असलेला पटवारी विक्रम बनकर आणि अशोक कुमार या आणखी एका कर्मचाऱ्याला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये अटक करण्यात आली. एसीबीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपीने शेतजमिनीच्या वाटणीसाठी लाच मागितली होती.

### सिलिंडरच्या स्फोटात हाऊसबोट खाक

**अलप्पुझा (केरळ)** : येथे एलपीजी सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागल्याने दोन हाऊसबोट जळून खाक झाल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अलाप्पुझा स्टेशनच्या अग्निशमन आणि बचाव सेवा अधिकाऱ्यांनी सांगितले की, अनाहिता आणि कॅथरीन या हाऊसबोट्स पलाथुरुथी येथे बंदिस्त होत्या आणि त्यापैकी एका बोटीत पर्यटक होते जेव्हा सकाळी ६.३० वाजता स्फोट झाला. एका हाऊसबोटीतील एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाला आणि आग जवळच्या बोटीत पसरली जिथे पर्यटक राहत होते.

### गॅस वितरकांची न्यायालयात धाव

**नागपूर** : इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा वाढवण्यासाठी सहा एलपीजी वितरकांनी दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय तसेच एका खाजगी कंपनीला नोटीस बजावली. याचिकाकर्त्यांनी असा दावा केला आहे की नागपूरमध्ये मुख्यालय असलेल्या कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लिमिटेडने घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरवठा वाढविण्यात अपयशी ठरले आहे.

### होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मार्ग काढणारे पहिले जहाज

# सौदीहून तेल घेऊन जहाज मुंबईत सुरक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पश्चिम आशियात इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेत तणाव वाढला असताना सौदी अरेबियाहून कच्चे तेल घेऊन येणारे एक जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग काढत मुंबईत पोहोचले आहे. आखाती प्रदेशात संघर्ष सुरू झाल्यापासून या मार्गाने सुरक्षितपणे भारतात पोहोचलेले हे पहिले जहाज मानले जात आहे.




माहितीनुसार, लायबेरियाचा ध्वज असलेल्या 'शेनलॉन्ग सुएझमॅक्स' या तेलवाहू जहाजाने १ मार्च रोजी सौदी अरेबियातील रास तनुरा बंदरावरून कच्चे तेल भरले होते. ३ मार्च रोजी ते भारताकडे रवाना झाले. मात्र होर्मुझच्या सामुद्रधुनीत सुरू असलेल्या संघर्षामुळे काही काळ जहाज त्या परिसरात अडकून राहिले. ८ मार्च रोजी या जहाजाचा शेवटचा सिग्नल होर्मुझच्या सामुद्रधुनीत नोंदवला गेला आणि त्यानंतर ते ट्रॅकिंग प्रणालीवरून गायब झाले. धोकादायक सागरी प्रदेशातून प्रवास करताना जहाजाच्या कर्मचाऱ्यांनी ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टम बंद केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही प्रणाली सामान्यतः जहाजाची ओळख, स्थान, दिशा आणि वेग याची माहिती सतत प्रसारित करत असते आणि आंतरराष्ट्रीय नियमांनुसार ती चालू ठेवणे आवश्यक असते. मात्र युद्ध किंवा संघर्षाच्या परिस्थितीत शत्रूपासून बचाव करण्यासाठी ही प्रणाली तात्पुरती बंद केली जाते.

मुंबई बंदर प्राधिकरणाचे उपसंरक्षक प्रवीण सिंग यांच्या माहितीनुसार, सुमारे १,३५,३३५ मेट्रिक टन कच्चे तेल घेऊन आलेले हे जहाज सध्या जवाहर बेट टर्मिनलवर उभे आहे. जहाजावरील तेल पूर्व मुंबईतील माहुल परिसरातील रिफायनरींकडे पाठवले जाणार असून संपूर्ण माल उतरवण्यासाठी सुमारे ३६ तास लागणार आहेत. या जहाजावर एकूण २९ सदस्यांचा क्रू असून त्यामध्ये भारतीय, पाकिस्तानी आणि फिलिपिनो खलाशांचा समावेश आहे. जहाजाचे कॅप्टन सुखांत सिंग संधू आहेत.

सौदी अरेबियाहून गुजरातमधील कंडला बंदराकडे येणाऱ्या 'मयुरी नारी' या थाई जहाजावर अलीकडेच हल्ला झाला होता. या हल्ल्यानंतर जहाजावर आग लागली आणि त्यातील तीन खलाशी अद्याप बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री यांच्यात झालेल्या चर्चेनंतर इराणने भारतीय जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग देण्याची तयारी दर्शवली होती. मात्र इराणकडून याबाबत अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही.

दरम्यान, देशात एलपीजी आणि तेलाच्या संभाव्य तुटवड्याबाबत चिंता व्यक्त केली जात असली तरी केंद्र सरकारने देशात इंधनाचे पुरेसे साठे उपलब्ध असल्याचा दावा केला आहे. विपक्षाकडूनही या मुद्द्यावर संसदेत सरकारला घेरण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## राहुल गांधी यांच्यावर निशिकांत दुबेंचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. चीन, अमेरिका आणि रशिया यांनी भारतावर हल्ला केल्यासच राहुल गांधी यांना समाधान मिळेल, असा आरोप दुबे यांनी गुरुवारी केला.

संसद परिसरात दुबे म्हणाले की, राहुल गांधी पंतप्रधानांनी सकाळी अमेरिकेचे नेते, दुपारी रशियाचे आणि संध्याकाळी चीनच्या नेतृत्वावर टीका करावी अशी अपेक्षा ठेवतात. पंतप्रधानांनी या तिन्ही देशांचा अपमान केला तरच राहुल गांधींच्या आत्म्याला शांती मिळेल, असा टोला त्यांनी लगावला.

दुबे यांनी आरोप केला की, चीन, अमेरिका आणि रशिया यांनी मिळून भारतावर बहिष्कार टाकला किंवा हल्ला केला तर राहुल गांधींना समाधान वाटेल, कारण त्यातून भारताचे विभाजन करण्याचा कट यशस्वी होईल. त्यांनी असा दावाही केला की भारताला तोडण्याच्या कटात राहुल गांधी सहभागी आहेत.

दुबे यांनी यावेळी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या श्रीलंकेतील गृहयुद्धादरम्यान भारतीय शांतता सेनेला पाठवण्याच्या निर्णयावरही टीका केली. त्या निर्णयामुळे भारतीय पंतप्रधानांवर परदेशात प्रथमच हल्ला झाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

अनेक शेजारी देशांमध्ये इंधन टंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असल्याचा दावा करत भारताची स्थिती तुलनेने चांगली असल्याचे दुबे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## हिंजवडी आयटी पार्कमध्ये एलपीजी तीव्र टंचाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील हिंजवडी आयटी पार्क सध्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या टंचाईमुळे मोठ्या अडचणीत सापडले आहे. गॅस पुरवठा खंडित झाल्याने कंपन्यांच्या कॅम्पसमधील किचनमधील शेगड्या विझल्या असून हजारो आयटी कर्मचाऱ्यांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना स्वतःचा डबा आणण्याच्या सूचना दिल्या आहेत.

गॅसअभावी कंपन्यांच्या फूड कोर्ट आणि कॅफेटेरियामध्ये नियमित स्वयंपाक करणे कठीण झाले आहे. त्यामुळे सध्या कॅफेटेरियामध्ये मर्यादित पदार्थच उपलब्ध आहेत. कार्यालयीन कार्यक्रम किंवा महत्त्वाच्या बैठकींसाठी दिल्या जाणाऱ्या विशेष केटरिंग सेवा तात्पुरत्या बंद करण्यात आल्या आहेत. परिस्थिती हाताळण्यासाठी काही कंपन्या बाहेरील किचनमधून जेवण मागवण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र ते अपुरे ठरत असल्याचे सांगितले जात आहे. 'रिटर्न टू ऑफिस' धोरणामुळे सध्या हजारो कर्मचारी पुन्हा कार्यालयात येत आहेत. पीजी किंवा हॉस्टेलमध्ये राहणारे आणि परराज्यातून आलेले कर्मचारी यामुळे विशेष अडचणीत सापडले आहेत. सकाळी लवकर घरून निघणाऱ्या कर्मचाऱ्यांना डबा तयार करणे किंवा बाहेरून खाण्याची व्यवस्था करणेही कठीण होत आहे.

या परिस्थितीवर आयटी कर्मचाऱ्यांच्या संघटना 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज'ने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. गॅस पुरवठा सुरळीत होईपर्यंत कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'ची सुविधा द्यावी, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे.

### महत्त्वपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच

# मुंबईतील ४ ठिकाणे बॉम्बने उडवण्याची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्याचे महत्त्वपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच मुंबईत बॉम्बस्फोट करण्याची धमकी देणारा ई-मेल आला आहे. त्यामुळे प्रशासनाची मोठी धावपळ उडाली आहे. या धमकीमध्ये केवळ विधान भवनच नव्हे, तर बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, मुंबई उच्च न्यायालय, मेट्रो यांच्या नावाचाही समावेश आहे. या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण दक्षिण मुंबईत हाय अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे.




महाराष्ट्र विधिमंडळाला बॉम्बने उडवून देण्याचा धमकीचा ई-मेल आल्यानंतर आज संपूर्ण दक्षिण मुंबईत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या धमकीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कडक पावलं उचलली आहेत. राहुल नार्वेकर यांनी आज दिवसभरासाठी अभ्यागतांना विधिमंडळात प्रवेश बंदी केली आहे. तसेच, सर्व प्रकारचे प्रवेश पास तात्पुरते रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती समोर आली आहे.विधिमंडळासोबतच आशियातील सर्वांत मोठा शेअर बाजार असलेल्या बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजलाही बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली होती. ही धमकी मिळाल्यानंतर आता मुंबई पोलिसांनी तातडीने बीएसई इमारतीत शोधकार्य सुरू केले आहे. सध्या राज्य राखीव पोलिस बल, बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. या पथकाकडून संपूर्ण परिसराची कसून तपासणी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी बीएसईच्या आत दोन विशेष पथके तैनात केली आहेत. यासोबतच प्रत्येक मजल्याची झाडाझडती घेतली जात आहे. इमारतीच्या बाहेरही मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्राथमिक तपासात अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही, मात्र खबरदारीचा उपाय म्हणून यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. हा ई-मेल कोणी आणि कुठून पाठवला, याचा तपास आता सायबर सेल आणि गुन्हे शाखेकडून केला जात आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू असतानाच ही धमकी आल्याने सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर पावले उचलली जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ६ वाजून ५७ मिनिटांनी 'सीपीए'च्या अधिकृत ईमेल आयडीवर हा धमकीचा संदेश प्राप्त झाला. यामध्ये इराण, इस्रायल आणि अमेरिकेतील संघर्षाचा संदर्भ देत खलिस्तानी आंदोलकांशी संबंधित असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार हा ई-मेल खोटा असण्याची शक्यता आहे, तरीही सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे यंत्रणांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### डॉ. विजय सूर्यवंशी यांची नियुक्ती

# अखेर पीसीएमसीला मिळाला पूर्णवेळ आयुक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेला अखेर पूर्णवेळ आयुक्त मिळाले असून राज्य शासनाने आयएएस अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांची महापालिका आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. सध्या ते कोकण विभागाचे विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत होते. शासनाने त्यांच्या बदलीचे आदेश जारी केले असून शहराच्या प्रशासनाची धुरा आता त्यांच्या खांद्यावर येणार आहे.

नवीन पदावर रुजू होण्यापूर्वी त्यांनी आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या मुख्य सचिवांच्या संमतीने संबंधित



अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून पिंपरी-चिंचवड येथे कार्यभार स्वीकारण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. या संदर्भातील आदेश सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी जारी केले आहेत. तसेच नवीन पदावर रुजू झाल्यानंतर त्याची माहिती तत्काळ शासनाला कळविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

डॉ. सूर्यवंशी हे २००६ च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण सातारा सैनिक स्कूल तसेच नाशिक जिल्ह्यातील देवळा येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. पुढे त्यांनी व्यवस्थापन विषयात पीएच.डी., एमबीए (मार्केटिंग), एलएलबी आणि बीएससी (फिजिक्स) अशी उच्च शिक्षणे पूर्ण केली आहेत.

९ मार्च २०१२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) येथे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. त्यानंतर राज्यातील अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करत त्यांनी प्रभावी प्रशासनाची छाप पाडली आहे. गोंदिया आणि रायगड जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी म्हणून काम करताना प्रशासनातील पारदर्शकता आणि विकास प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी केली. याशिवाय कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) येथे अतिरिक्त आयुक्त तसेच महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

### राष्ट्रपती मुर्मू यांची अयोध्या भेट

**अयोध्या** : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या १९ मार्च रोजी होणाऱ्या अयोध्या दौऱ्याच्या तयारीचा आणि आगामी रामनवमी उत्सवाचा आढावा घेतला. रामजन्मभूमी मंदिरातील व्यवस्थेची पाहणी करताना, आदित्यनाथ यांनी श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. राष्ट्रपतींच्या भेटीसाठी सर्व तयारी वेळेवर पूर्ण व्हावी यासाठी त्यांनी आवश्यक निर्देश दिले. आढावा बैठकीत अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना मुर्मू यांच्या दौऱ्याच्या तयारीची माहिती दिली.

## रोहित पवार राहुल गांधींच्या भेटीला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आमदार रोहित पवार यांनी दिल्लीत जावून काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी रोहित पवार यांनी राहुल गांधी यांच्याकडे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेबाबत माहिती दिली.

राहुल गांधींच्या भेटीनंतर त्यांच्यासोबत काय चर्चा झाली? याबाबत रोहित पवारांनी सविस्तर माहिती दिली. "राहुल गांधी यांच्यासोबत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत चर्चा केली. मी एफआयआर बद्दल सांगितलं, अजित पवार यांच्या अपघात प्रकरणात दुर्दैवाने एफआयआर घेतला जात नाही, त्यात ते थोडेसे आश्चर्यचकीत झाले. त्याचं कारण म्हणजे या देशामध्ये प्रत्येक व्यक्तीचा एफआयआर होणं हा हक्क आहे", असं रोहित पवार म्हणाले.

"महाराष्ट्रामध्ये एवढा मोठा नेता म्हणजेच अजित पवार यांचा एफआयआर घेतला जात नाही याचं राहुल गांधी यांचा आश्चर्य वाटलं. त्याचबरोबर सीबीआयकडे प्रस्ताव पाठवला आहे. पण तो पोहोचलाय का? पोहचला असेल तर तो स्वीकारला का जात नाही? असा प्रश्न केल्यानंतर ते म्हणाले त्याबाबतीत आपल्याला पाठपुरावा करावा लागेल. तेलगू देसम पार्टी, व्हीएसआर आणि वी के सिंग यांचं आर्थिक आणि वैयक्तिगत जे नातं आहे, त्याबद्दलची माहिती त्यांना सांगितली. सगळ्या गोष्टी बघितल्यानंतर त्यांनी मला शब्द दिलाय की, काँग्रेस पक्षाकडून किंवा त्यांच्याकडून जी काही ताकद लागेल किंवा मदत लागेल ती पूर्णपणे आम्ही करू. त्यांनी मला पुढच्या दोन दिवसांत काय करु याबाबत एक शब्द दिला आहे. पण मी दोन दिवसांत तुम्हाला याबाबतची माहिती आपल्याला देईन. राहुल गांधी यांच्याकडून अतिशय महत्त्वाची मदत होईल, असं आम्हाला वाटतं. दोन दिवसांत ती काय गोष्ट होती आणि काय मदत झाली, याबाबत मी नक्की सांगेन", अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.

### अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा मोठा निर्णय

# स्वस्त धान्य दुकानांत तीन महिन्यांचे धान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : अमेरिका आणि इराणच्या युद्धाचा परिणाम भारतात झाला आहे. या युद्धामुळे भारतात पुरवठा होणारा एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला. आता भारतामध्ये थेट मोठे परिणाम बघायला मिळत आहेत. यादरम्यानच प्रशासनाकडून राज्यातील स्वस्त दुकानात तीन महिन्यांचे रेशन एकदाच देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. युद्धाचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने सरकार तीन महिन्यांचे धान्य रेशन दुकानांत पोहोचवणार आहे. राज्यभरातील ५१ हजारपेक्षा जास्त रेशन दुकानांत तीन



महिन्यांचे धान्य उपलब्ध करून देणार आहे.
स्वस्त धान्य दुकानांत एप्रिल, मे आणि जून महिन्याचा धान्यसाठा पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागपूर जिल्ह्यातील १९०० स्वस्त धान्य दुकानांत तीन महिन्यांचा धान्यसाठा केला जाणार आहे.
भविष्यात युद्धाचे परिणाम तीव्र होण्याच्या भीतीने तीन महिन्यांचे धान्य वितरण होणार आहे. नागपूर जिल्ह्यातील रेशन दुकानांमध्ये महिन्याला १६ हजार मेट्रिक टन धान्यसाठ्याची गरज आहे. गहू आणि तांदळाचा तीन महिन्यांचा पुरवठा केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्य सरकार तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी दुकानात पाठवणार आहे. युद्धामुळे डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यास धान्य वितरणात अडथळा येण्याची शक्यता आहे.
नंदुरबार जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचा वाहनांमध्ये बेकायदेशीर वापर करणाऱ्या वाहनांवर आरटीओ विभागाने मोठी कारवाई केली आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान तब्बल ८० वाहने जप्त करण्यात आली असून या कारवाईमुळे गॅसच्या काळा बाजाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. तपासणीदरम्यान अनेक वाहनांमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले. संबंधित वाहनधारकांना तात्काळ सिलिंडर काढून घेण्याचे आदेश देण्यात आले असून, भविष्यात अशा प्रकारे घरगुती गॅसचा वापर करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. जिल्ह्यात घरगुती गॅसचा साठा मर्यादित असल्याने आणि वाहनांमध्ये त्याचा गैरवापर होत असल्याने गॅसचा काळा बाजार वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

## मूसेवाला हत्याकांडात दोन आरोपींना जामीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला यांच्या २०२२ मधील हत्याकांडात सर्वोच्च न्यायालयाने दोन आरोपींना जामीन मंजूर केला आहे. पवन कुमार बिश्नोई आणि जगतार सिंह या आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने जामीन नाकारल्याच्या निर्णयाला आव्हान देत आरोपींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आरोपींकडून असा युक्तिवाद करण्यात आला की या प्रकरणात सुमारे १८० साक्षीदार आहेत आणि खटल्याची सुनावणी पूर्ण होण्यासाठी बराच काळ लागणार आहे. तसेच पवन बिश्नोई तीन वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असल्याचेही न्यायालयासमोर मांडण्यात आले. या बाबींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने दोघांना जामीन मंजूर केला. पवन बिश्नोईवर हत्येसाठी वापरलेल्या बोलेरो वाहनाची व्यवस्था केल्याचा आरोप आहे, तर जगतार सिंहवर मूसेवालाच्या घराजवळ रेकी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र सुनावणीनंतर न्यायालयाने दोघांनाही जामीन देण्याचा निर्णय घेतला.

सिद्धू मूसेवाला यांची २९ मे २०२२ रोजी पंजाबमधील मानसा जिल्ह्यातील जवाहरके गावात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. ते कारने जात असताना त्यांच्यावर अंधाधुंद गोळीबार केला होता.

## संपादकीय

# राज्यपालांचे राजकारण



**राज्यपालपद हे भारतीय राज्यघटनेत 'निरपेक्ष संवैधानिक प्रमुख' म्हणून कल्पिले गेले. पण अलीकडील राज्यपाल बदल आणि नियुक्त्या पाहता हा पदभार अधिकाधिक राजकीय होत असल्याची भावना निर्माण होते. केंद्र–राज्य संबंधांच्या ताणात राजभवनांची भूमिका नव्याने चर्चेत आली आहे.**

भारतीय राज्यघटनेच्या रचनेत राज्यपाल या पदाची कल्पना अत्यंत सूक्ष्म विचारातून करण्यात आली होती. राज्यात निवडून आलेल्या सरकारवर नियंत्रण ठेवणे हा त्याचा उद्देश नव्हता; उलट राज्यघटनेचा रक्षक म्हणून संतुलन राखणे ही त्याची अपेक्षित भूमिका होती. म्हणूनच राज्यपालांना अनेक अधिकार दिले गेले असले तरी ते प्रत्यक्ष शासनकारभार चालविणारे नसून 'संवैधानिक प्रमुख' मानले गेले. परंतु प्रत्यक्ष राजकारणात या पदाचे स्वरूप अनेकदा वेगळेच दिसते. अलीकडे केंद्र सरकारने अनेक राज्यांतील राज्यपालांची मोठ्या प्रमाणावर फेरबदल केली. काही राज्यांमध्ये नव्या नियुक्त्या, काही ठिकाणी बदली आणि काही ठिकाणी अतिरिक्त जबाबदाऱ्या देण्यात आल्या. पश्चिम बंगाल, दिल्ली, तेलंगणा यांसारख्या महत्त्वाच्या राज्यांमध्ये झालेले बदल विशेष चर्चेत आले. उदाहरणार्थ, तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांची बदली पश्चिम बंगालमध्ये करण्यात आली, तर अमेरिकेतील माजी राजदूत तरणजीत सिंग संधू यांची दिल्लीच्या उपराज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली. औपचारिकरीत्या पाहता अशा नियुक्त्या आणि बदल ही केंद्र सरकारची संवैधानिक अधिकारक्षेत्रातील बाब आहे. राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती करतात आणि प्रत्यक्षात त्या प्रक्रियेत केंद्र सरकारची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे बदल होणे ही नवीन बाब नाही. पण प्रश्न बदलांचा नसतो; प्रश्न त्यामागील राजकीय संदर्भाचा असतो. भारतीय संघराज्य व्यवस्था ही केंद्र आणि राज्य यांच्यातील संतुलनावर उभी आहे. संविधानाने केंद्राला अनेक महत्त्वाचे अधिकार दिले असले तरी राज्यांची स्वायत्तता हा देखील तितकाच महत्त्वाचा घटक आहे. राज्यपाल हे या दोन स्तरांमधील दुवा म्हणून काम करतात. परंतु जेव्हा राज्यपालांचे वर्तन एखाद्या राजकीय पक्षाच्या भूमिकेशी जुळते असे वाटू लागते, तेव्हा हा दुवा तणावाचे कारण बनतो. पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, तेलंगणा अशा अनेक राज्यांत गेल्या काही वर्षांत राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष सार्वजनिक पातळीवर दिसून आला. विधानसभेच्या भाषणांपासून ते विधेयकांवर स्वाक्षरी करण्यापर्यंत अनेक मुद्द्यांवर मतभेद झाले. काही वेळा राज्यपालांनी विधेयकांना मंजुरी देण्यास विलंब केला, तर काही ठिकाणी सरकारवर थेट टीकाही केली. या घटनांमुळे राज्यपालपदाच्या मर्यादा आणि अधिकारांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयालाही हस्तक्षेप करावा लागला. एका महत्त्वाच्या प्रकरणात न्यायालयाने स्पष्ट केले की राज्यपालांना विधेयकांवर 'पॉकेट व्हेटो'चा अधिकार नाही; म्हणजेच विधानसभेने मंजूर केलेले विधेयक अनिश्चित काळ प्रलंबित ठेवता येत नाही. न्यायालयाने राज्यपालांच्या अधिकारांवर मर्यादा घालून संघराज्य तत्त्वाची पुनरुज्जीवित व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. या पदाची खरी शक्ती परंपरेत आहे. संविधानाने राज्यपालांना काही अधिकार दिले असले तरी त्यांचा वापर संयमाने आणि अपवादात्मक परिस्थितीतच करणे ही एक अनलिखित परंपरा होती. राजभवन हे सार्वजनिक वादांचे केंद्र नसून शांत संवैधानिक संस्थेचे प्रतीक मानले जात असे. अलीकडच्या काळात मात्र ही शांतता भंग झालेली दिसते. काही राज्यांमध्ये राजभवन आणि सचिवालय यांच्यातील मतभेद उघडपणे समोर येऊ लागले. सामाजिक माध्यमांवरून टीका, पत्रकार परिषदांमधून आरोप आणि विधेयकांवरून निर्माण होणारे संघर्ष या सर्वांमुळे राज्यपालपदाची प्रतिमा बदलू लागली. राज्यपालपदाच्या या बदलत्या स्वरूपाचा परिणाम संघराज्य व्यवस्थेवर होतो. राज्यघटनेच्या निर्मात्यांनी या पदाची कल्पना करताना ब्रिटिश संसदीय पद्धतीचा आधार घेतला होता. तिथे सम्राट किंवा राज्यपाल हे केवळ औपचारिक प्रमुख असतात; प्रत्यक्ष सत्ता निवडून आलेल्या सरकारकडे असते. भारतातही हेच तत्त्व अपेक्षित होते. पण राजकारणाच्या बदलत्या स्वरूपामुळे या पदाची व्याख्या सतत बदलत राहिली. आजची परिस्थिती अशी आहे की राज्यपालपदाबद्दलचा वाद केवळ व्यक्तींचा राहिलेला नाही; तो संस्थेचा झाला आहे. राज्यपालांचे वारंवार बदल, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या नियुक्त्या आणि राज्य सरकारांशी वाढणारे संघर्ष या सर्वांनी या पदाभोवतीचा संशय अधिक गडद केला आहे. भारतीय संघराज्य व्यवस्थेची ताकद तिच्या संतुलनात आहे. हे संतुलन बिघडले तर त्याचा परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही होतो. म्हणूनच राज्यपालपदाच्या संदर्भात परंपरा, संयम आणि निरपेक्षता या तीन मूल्यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करण्याची गरज आहे. राज्यपाल हे केंद्राचे प्रतिनिधी असतात, पण ते राज्यघटनेचेही प्रतिनिधी असतात. या दोन भूमिकांमधील संतुलन राखणे हीच या पदाची खरी कसोटी आहे. आजच्या फेरबदलांनी पुन्हा एकदा हा प्रश्न उपस्थित केला आहे आणि तो म्हणजे राजभवन हे संवैधानिक संतुलनाचे प्रतीक राहणार की राजकारणाचे नवे मैदान बनणार?

# भारतीयांचा डिजिटल सोन्याचा मोह

भारतात सोन्याचा प्रश्न हा केवळ गुंतवणुकीचा नसतो; तो संस्कृतीचा असतो. लग्नसमारंभ, सण, बचत आणि सुरक्षितता या सर्वांचा केंद्रबिंदू म्हणून सोन्याने भारतीय अर्थव्यवस्थेत विशेष स्थान मिळवले आहे. अनेक दशकांपासून भारतीय कुटुंबे सोन्याकडे 'सुरक्षित संपत्ती' म्हणून पाहतात. परंतु तंत्रज्ञानाच्या युगात या पारंपरिक सवयीने एक नवे रूप धारण केले आहे. ते म्हणजे डिजिटल गोल्ड.

आज मोबाईल ॲपच्या एका क्लिकवर काही रुपयांपासून सोन्याची खरेदी करता येते. गुगल पे, फोनपे, पेटीएमसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून लाखो लोक रोज थोड्या-थोड्या प्रमाणात सोने खरेदी करीत आहेत. ही प्रक्रिया इतकी सहज आहे की अनेकांना ते नेमके कोणते आर्थिक उत्पादन आहे याचाही विचार करावा लागत नाही. किंबहुना, 'सोनं म्हणजे सुरक्षित' ही मानसिकता या नव्या माध्यमातही तितक्याच सहजतेने स्थानापन्न झाली आहे.

डिजिटल गोल्डची संकल्पना साधी आहे. ग्राहक ऑनलाइन सोने खरेदी करतो आणि सेवा देणारी कंपनी त्या प्रमाणात भौतिक सोने आपल्या तिजोरीत साठवून ठेवते, असा दावा केला जातो. ग्राहकाला हवे असल्यास ते सोने विकता येते किंवा काही अटींवर भौतिक स्वरूपात मागवता येते. सोपेपणा, लहान रकमेतील गुंतवणूक आणि डिजिटल व्यवहाराची सवय या तिन्ही कारणांमुळे या उत्पादनाचा प्रसार झपाट्याने वाढला आहे.

पण या चमकदार सोयीमागे काही मूलभूत प्रश्न दडलेले आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नियमनाचा. डिजिटल गोल्ड हा आर्थिक उत्पादन म्हणून कोणत्याही प्रमुख नियामक संस्थेच्या नियंत्रणाखाली येत नाही. तो ना शेअर बाजार नियामक संस्थेच्या कक्षेत आहे, ना बँकिंग नियामकांच्या. परिणामी या व्यवहारांवर औपचारिक देखरेख नसते.

याचा अर्थ असा की ग्राहकांनी केलेली गुंतवणूक प्रत्यक्षात कितपत सुरक्षित आहे याची खात्री देणारी कोणतीही संस्थात्मक हमी उपलब्ध नाही. कंपनी खरोखरच तितके सोने साठवून ठेवते का, त्याचे ऑडिट होते का, किंवा कंपनी आर्थिक अडचणीत आली तर गुंतवणूकदारांचे पैसे सुरक्षित राहतील का या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट नाहीत.




**» भारतीय समाजाला सोन्याचे आकर्षण नवे नाही. मात्र आता सोने तिजोरीत नव्हे, तर मोबाईल ॲपच्या पडद्यावर दिसते. 'डिजिटल गोल्ड' म्हणून ओळखली जाणारी ही गुंतवणूक लोकप्रिय होत असली तरी तिच्या वेगाबरोबरच संभाव्य आर्थिक धोक्यांची छाया वाढत आहे.**

अर्थात, या उत्पादनाचे समर्थक युक्तिवादही मांडतात. त्यांच्या मते डिजिटल गोल्डमुळे छोट्या गुंतवणूकदारांना सोन्यात गुंतवणुकीची संधी मिळते. भौतिक सोन्याच्या साठवणुकीचा प्रश्न राहत नाही. चोरीचा धोका टळतो. व्यवहार पारदर्शक असतात. परंतु आर्थिक उत्पादनांच्या जगात सोयीपेक्षा विश्वास महत्त्वाचा असतो. आणि विश्वास हा केवळ तंत्रज्ञानावर नव्हे, तर नियमनावर उभा असतो.

याच कारणामुळे बाजार नियामक संस्थांनीही वेळोवेळी सावधगिरीचा इशारा दिला आहे. डिजिटल गोल्ड हे अधिकृतपणे नियंत्रित आर्थिक उत्पादन नसल्याने गुंतवणूकदारांना कोणतेही संस्थात्मक संरक्षण उपलब्ध नसते, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

यामुळे संभाव्य धोके वाढतात. उदाहरणार्थ, प्लॅटफॉर्म बंद पडल्यास गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळतील याची खात्री नसते. किंमत निर्धारणात पारदर्शकता नसण्याची शक्यता असते. व्यवहारातील शुल्क आणि स्प्रेड यामुळे प्रत्यक्ष गुंतवणुकीचा खर्चही वाढू शकतो. याशिवाय सायबर सुरक्षेचे धोकेही वाढलेले आहेत. काही प्रकरणांत डिजिटल गुंतवणूक खात्यांमधून मोठ्या प्रमाणात रक्कम किंवा डिजिटल सोने चोरीला गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

मात्र या प्रश्नाचा एक व्यापक आर्थिक पैलूही आहे. भारतात डिजिटल पेमेंट्स आणि फिनटेक क्षेत्राचा विस्तार झपाट्याने होत आहे. त्यातून नव्या आर्थिक उत्पादनांची निर्मितीही होत आहे. परंतु प्रत्येक नव्या उत्पादनासोबत नियमनाची चौकट उभी राहणे आवश्यक असते. अन्यथा नवकल्पना आणि अव्यवस्था यांच्यातील रेषा धूसर होते.

डिजिटल गोल्डच्या बाबतीत सध्या नेमके हेच घडताना दिसते. बाजाराचा विस्तार आधी झाला आणि नियमनाचा विचार नंतर सुरू झाला. परिणामी लाखो ग्राहक एका अशा उत्पादनात गुंतवणूक करीत आहेत ज्याची सुरक्षा आणि पारदर्शकता अद्याप स्पष्ट नाही. भारतात सोन्याबद्दलची भावनिक नाळ इतकी मजबूत आहे की कोणतेही नवे माध्यम त्या आकर्षणाचा फायदा घेऊ शकते. डिजिटल गोल्डच्या वाढत्या लोकप्रियतेतही हेच दिसते. मात्र अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने भावनांवर नव्हे तर संस्थात्मक विश्वासावर आधारित व्यवस्था आवश्यक असते.

डिजिटल अर्थव्यवस्था ही भारताची मोठी ताकद ठरू शकते. पण त्या अर्थव्यवस्थेची पायाभरणी मजबूत नियमनावर असणे आवश्यक आहे. अन्यथा चमकदार ॲप्सच्या पडद्यावर दिसणारे सोने एक दिवस गुंतवणूकदारांसाठी केवळ आभासी ठरू शकते.

# स्थायी समिती बैठकीत विविध प्रस्तावांना मंजुरी

## पाणीपुरवठा, विद्युत देखभाल, दफनभूमी विकास, कर संकलन यांचे प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या मुख्य प्रशासकीय भवनात बुधवारी स्थायी समितीची बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीत शहरातील पाणीपुरवठा, विद्युत देखभाल, दफनभूमी विकास, कर संकलन आणि विविध पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

बैठकीस महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह स्थायी समिती सदस्य आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाईपलाईन दुरुस्ती आणि नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली. घरकुल ते जाधववाडी पंप हाऊस तसेच कुदळवाडी एसटीपी ते लक्ष्मी चौक, देहू-आळंदी रोड या दरम्यान आवश्यकतेनुसार पाईपलाईन टाकण्यास मान्यता देण्यात आली. तसेच पाणीपुरवठा विभागाकडील शहरातील पाण्याची आणि नद्यांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. शहरातील विद्युत सुविधा मजबूत करण्यासाठी काळेवाडी परिसर तसेच प्रभाग क्रमांक १६, १७, ११ आणि १३ मधील रस्ते दिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे मंजूर करण्यात आली. गंजलेले व धोकादायक पोल बदलणे, 'ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या नवीन इमारतीतील विद्युत देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासही मान्यता देण्यात आली. तसेच निगडी अमरधाम स्मशानभूमी आणि यमुनानगर रुग्णालय येथे जनित्र संच बसविण्याच्या कामांनाही हिरवा कंदील देण्यात आला. प्रभाग क्रमांक १ आणि १२ मधील विविध चौक व कमानींचे सुशोभीकरण, भक्ती शक्ती चौकातील अण्णाभाऊ साठे बस टर्मिनल येथे ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणे, तसेच महापालिका शाळा, कार्यालये आणि दवाखान्यांमधील पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पद्धतीने स्वच्छता करण्याच्या कामांना देखील मंजुरी देण्यात आली.

भामा-आसखेड धरणावरील अशुद्ध जलउपसा केंद्र ते नवलाख उंब्रे ब्रेक प्रेशर टाकीपर्यंत १७०० मिमी व्यासाची रायझिंग मेन टाकणे तसेच बीपीटी ते चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १४०० मिमी व्यासाची गुरुत्व जलवाहिनी टाकण्याच्या कामांमध्ये अडथळा ठरणारे उच्चदाब खांब व तारा स्थलांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली.

# पाली साहित्य संमेलन अध्यक्षपदी डॉ. बिमलेंद्र कुमार यांची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरात अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पाली अभ्यासक प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार यांची निवड करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच पद्मपाणी फाऊंडेशन आणि अभिजात भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २२ मार्च रोजी पुण्यात हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या निवडीची अधिकृत घोषणा संमेलनाचे मुख्य आयोजक राहुल डंबाळे, पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे प्रमुख डॉ. महेश देवकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सिद्धार्थ धेंडे, सहस्वागताध्यक्ष डॉ. गौतम चाबुकस्वार तसेच पद्मपाणी फाऊंडेशनच्या संचालिका सुवर्णा डंबाळे यांनी संयुक्तपणे केली. प्रा. डॉ. बिमलेंद्र कुमार हे पाली भाषा आणि बौद्ध तत्त्वज्ञानातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त अभ्यासक मानले जातात. त्यांच्या अध्यक्षतेमुळे संमेलनाला वैचारिक आणि शैक्षणिक उंची प्राप्त होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. डॉ. कुमार यांनी पाली भाषेतील 'अभिधम्म' तत्त्वज्ञान तसेच 'धम्मसंगणी' आणि 'भेषज्जमंजूषा' यांसारख्या जटिल ग्रंथांवर सखोल संशोधन केले आहे. पाली साहित्याचा प्रचार-प्रसार, संवर्धन आणि संशोधनाला चालना देणे हा या संमेलनामागील मुख्य उद्देश आहे. या संमेलनासाठी देशभरातील पाली भाषा अभ्यासक, संशोधक आणि साहित्यिक मोठ्या संख्येने पुण्यात उपस्थित राहणार आहेत.

# स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक महत्त्व लक्षात घेता पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करण्यात यावे, अशी मागणी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान केली. 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'च्या माध्यमातून त्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करत प्रशासकीय सुलभतेसाठी या मागणीचा पाठपुरावा केला.

राज्य सरकारने अलीकडेच ११ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांना मंजुरी दिली आहे. मात्र आशियातील मोठ्या औद्योगिक वसाहतींपैकी एक असलेल्या आणि लाखो नागरिकांचे निवासस्थान असलेल्या पिंपरी-चिंचवडचा या यादीत समावेश करण्यात आलेला नाही. हा शहरावर अन्याय असल्याचे आमदार अमित गोरखे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या सध्या २० ते २५ लाखांच्या दरम्यान असून ती अनेक जिल्ह्यांच्या एकूण लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या समस्या हाताळण्यासाठी सध्याची प्रशासकीय यंत्रणा अपुरी पडत आहे. जमीन हस्तांतरण, अकृषक (एनए) परवानगी, पुनर्वसन आणि गुंठेवारी नियमितीकरणासारख्या कामांसाठी नागरिकांना वारंवार पुणे येथे जावे लागते.

# शहरात गॅस टंचाई; खाद्यतेल व सुकामेवा महाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : औद्योगिक नगरी असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात सध्या घरगुती आणि व्यावसायिक एलपीजी गॅसचा तुटवडा जाणवू लागला आहे. शहरातील विविध गॅस एजन्सींसमोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसत असून, बुकिंग केल्यानंतरही अनेकांना वेळेत सिलिंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. गुढीपाडवा आणि रमजानच्या पार्श्वभूमीवर ही टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांसोबतच हॉटेल व्यावसायिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



सध्या घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात सुमारे ६० रुपयांची तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात सुमारे ११५ रुपयांची वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या नागरिकांना दुहेरी फटका बसत आहे. शहरातील अनेक भागांत गॅस सिलिंडर मिळण्यासाठी ग्राहकांना १० ते १५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याची माहिती समोर आली आहे. गॅस पुरवठ्यातील या विलंबामुळे अनेक कुटुंबांना पर्यायी उपायांचा अवलंब करावा लागत आहे. काही घरांमध्ये इंडक्शन किंवा इलेक्ट्रिक शेगड्यांचा वापर सुरू करण्यात आला आहे, तर काही ठिकाणी सिलिंडर संपण्याच्या भीतीने स्वयंपाक मर्यादित करण्याचा निर्णय घेतला जात आहे. परिणामी गृहिणींना दैनंदिन स्वयंपाक करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गॅस टंचाईचा सर्वाधिक परिणाम शहरातील हॉटेल व्यवसाय आणि विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या खाणावळींवर होत आहे. आकुर्डी, रावेत, चिंचवड, पिंपरी आणि यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय परिसरात विद्यार्थ्यांच्या मेस मोठ्या प्रमाणावर चालतात. व्यावसायिक गॅस उपलब्ध न झाल्याने अनेक खाणावळ चालकांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या जेवणाच्या वेळा कमी केल्या आहेत. काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात खाणावळ बंद ठेवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

या परिस्थितीमुळे शहरात शिक्षणासाठी आलेल्या हजारो विद्यार्थ्यांसमोर जेवणाची समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, गॅस टंचाईसह खाद्यतेल आणि सुकामेव्याच्या दरातही वाढ झाल्याने सणासुदीच्या काळात नागरिकांच्या खर्चात मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शांततामय इंधन पुरवठा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकले नाहीत: कॉँग्रेसचा आरोप

# बंद गॅस पाईपलाईन प्रकल्पांबाबत श्वेतपत्रिका काढावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : २०१४ नंतर बंद किंवा भूमिगत गॅस पाईपलाईनद्वारे इंधन पुरवठा करण्यासाठी कोणते प्रकल्प कार्यान्वित झाले याबाबत केंद्र सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी कॉँग्रेसने केली आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणात सातत्य न राहिल्यामुळे तेल उत्पादक देशांसोबतचे शांततामय इंधन पुरवठा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकले नाहीत, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला.

ते म्हणाले की, डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या काळात (२००४–२०१४) क्रूड तेल व नैसर्गिक वायू बंद पाईपलाईनद्वारे वितरित करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजना आणि प्रकल्पांवर चर्चा तसेच काही प्रमाणात अंमलबजावणी झाली होती. त्यामधील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे इराण–पाकिस्तान–भारत गॅस पाईपलाईन होय. 'पीस पाईपलाईन' म्हणून ओळखला जाणारा हा सुमारे २७०० किलोमीटर लांबीचा प्रकल्प इराणमधून नैसर्गिक वायू पाकिस्तानमार्गे भारतात आणण्याचा होता आणि दक्षिण आशियातील इंधन गरज भागविण्यासाठी महत्त्वाचा मानला जात होता.

२००५ ते २००७ या काळात या प्रकल्पावर व्यापक चर्चा झाली होती. पंतप्रधान मनमोहन सिंह यांनीही या प्रकल्पाबाबत सकारात्मक भूमिका घेतली होती. २००६ मध्ये त्यांनी हा प्रकल्प भारत, इराण आणि पाकिस्तान या तिन्ही देशांच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला होता. २००७ मध्ये भारत आणि पाकिस्ताननेही या प्रकल्पाला पाठिंबा दर्शविला होता. मात्र, अमेरिकेच्या निर्बंधांच्या दबावामुळे, विशेषतः इराणवरील निर्बंध आणि अणुकराराच्या पार्श्वभूमीवर, तसेच भू-राजकीय अनिश्चितता, बँकिंग व वित्तपुरवठ्याशी संबंधित जोखमींमुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात पुढे सरकू शकला नाही आणि अखेर तो थांबला, असे तिवारी यांनी सांगितले.


त्यांनी सांगितले की, यूपीए सरकारच्या काळात देशात राष्ट्रीय गॅस ग्रिड उभारण्याची संकल्पनाही मांडण्यात आली होती. २०१२ मध्ये तत्कालीन पेट्रोलियम मंत्री एस. जयपाल रेड्डी यांनी देशभर सुमारे ३० हजार किलोमीटर लांबीचे नैसर्गिक वायू पाईपलाईन नेटवर्क उभारण्याची योजना जाहीर केली होती. यामुळे देशातील विविध भागांमध्ये पाईपलाईनद्वारे गॅस वितरण सुलभ होणार होते.

याच काळात दाभोळ–बंगळुरू गॅस पाईपलाईन हा महत्त्वाचा प्रकल्पही पूर्ण करण्यात आला. सुमारे एक हजार किलोमीटर लांबीच्या आणि सुमारे ४,५०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचे उद्घाटन मनमोहन सिंह यांनी २०१३ मध्ये केले होते. महाराष्ट्र ते कर्नाटक या दरम्यान नैसर्गिक वायू पुरवठा करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जातो. तसेच त्या काळात देशातील विविध गॅस पाईपलाईन नेटवर्कचा विस्तारही करण्यात आला. विशेषतः गेल इंडिया लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्या माध्यमातून पूर्व आणि पश्चिम भारतात गॅस पुरवठा वाढविण्यासाठी पाईपलाईन नेटवर्क विकसित करण्यात आले होते. क्रूड तेलाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर आयात समुद्रमार्गे टँकर्सद्वारे होत असली तरी देशांतर्गत रिफायनरीपर्यंत काही महत्त्वाच्या पाईपलाईनही विकसित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सालाया–मथुरा पाईपलाईन तसेच पारादीप–हल्दिया पाईपलाईन यांसारख्या प्रकल्पांचा विस्तार करण्यात आला होता.

देशाचे परराष्ट्र धोरण सातत्यपूर्ण राहिले असते तर तेल उत्पादक राष्ट्रांसोबतचे शांततामय संबंध अधिक दृढ झाले असते आणि इंधन सुरक्षेच्या दृष्टीनेही देश अधिक सक्षम ठरला असता. मात्र २०१४ नंतर अशा प्रकल्पांच्या प्रगतीबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे बंद गॅस पाईपलाईन प्रकल्पांबाबत २०१४ नंतर नेमके किती काम झाले, याची माहिती देण्यासाठी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी त्यांनी केली.

# १६ हजार लघुउद्योग अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड येथे उमटू लागले आहेत. कच्च्या मालाच्या पुरवठ्यात मोठा तुटवडा निर्माण झाल्याने शहरातील सुमारे १६ हजार लघुउद्योग आर्थिक संकटात सापडल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

मध्यपूर्वेतील तणावामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारमार्ग आणि समुद्री वाहतूक विस्कळीत झाली आहे. विशेषतः तेल-गॅस आणि औद्योगिक कच्चा माल वाहतूक होणाऱ्या महत्त्वाच्या समुद्री मार्गांवर परिणाम झाल्याने पुरवठा साखळी कोलमडू लागली आहे. त्यामुळे कच्च्या मालाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली असून उद्योगांचे उत्पादन खर्च वाढले आहेत.

पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील अनेक उद्योग कच्च्या मालासाठी आयातीवर अवलंबून आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर बंदरांमधील हालचाली कमी झाल्याने आयात-निर्यात प्रक्रिया मंदावली आहे. परिणामी काही उद्योगांमध्ये उत्पादन कमी करावे लागले असून काही ठिकाणी कामकाज अंशतः बंद ठेवण्याची वेळ आली आहे. ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी आणि घटक उत्पादन करणाऱ्या लघुउद्योगांवर सर्वाधिक परिणाम होत आहे. स्टील, रसायने, प्लास्टिक ग्रॅन्यूल्स आणि इतर आयातित घटकांच्या दरात वाढ झाल्याने उद्योगांच्या नफ्यावर मोठा ताण निर्माण झाला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### प्लॉट विक्रीच्या आमिषाने फसवणूक

**लोणी काळभोर :** प्लॉट विक्रीचे आमिष दाखवून पाच लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून प्लॉट खरेदी-विक्रीच्या व्यवहारात नागरिकांनी अधिक सावध राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे. सतेश चंद्रशेखर पाषाणकर, राहुल लक्ष्मण सुतार आणि नितीन जगताप अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी काळूराम बाळासाहेब लवांडे (वय ३३, रा. शेवाळवाडी, पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, आरोपींनी प्लॉट विक्रीचे आमिष दाखवून लवांडे यांच्याकडून सुमारे पाच लाख रुपये घेतले. मात्र पैसे घेतल्यानंतरही प्लॉटचा व्यवहार पूर्ण केला नाही.

### रामदरा डोंगरावर भीषण वणवा

**लोणी काळभोर :** येथील तीर्थक्षेत्र रामदरा परिसरातील डोंगरावर लागलेल्या भीषण वणव्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी झाल्याची घटना समोर आली आहे. या आगीत लाखो झाडांसह असंख्य कीटक, सरपटणारे प्राणी आणि पशुपक्ष्यांचे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच अनेक दुर्मिळ वनस्पती आणि वन्यजीवांचे अधिवासही नष्ट झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. रामदरा परिसरातील वनविभागाच्या हद्दीतील डोंगरावर काल दुपारच्या सुमारास अचानक आग लागली. सुरुवातीला लहान असलेली ही आग वाऱ्याच्या जोरामुळे काही वेळातच भीषण स्वरूप धारण करत संपूर्ण डोंगर परिसरात पसरली. या वणव्यामुळे खैर, करवंद, कडुनिंब, चंदन, टंटणी तसेच विविध प्रजातींच्या बाभळींसह अनेक झाडे जळून खाक झाली. वणव्याची माहिती मिळताच ग्रीन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित जगताप आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोती आणि झाडांच्या फांद्यांच्या सहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र वाऱ्याची साथ मिळाल्यामुळे आग वेगाने पसरत गेली आणि कार्यकर्त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले. या घटनेमुळे जैवविविधतेला मोठा फटका बसला आहे.

---

हंगामात गळीत झालेल्या संपूर्ण उसासाठी

# श्री छत्रपतीने केले 236 कोटी रुपये अदा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने यावर्षीच्या गळीत हंगामात शेवटच्या पंधरावड्यात आलेल्या ऊसाचे १८ कोटी १८ लाख रुपये ऊस उत्पादकांच्या बँक खात्यात वर्ग केले आहेत. कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक आणि उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी सांगितले की, "वजन चोख पैसे रोख" या तत्वानुसार हंगामात गळीत झालेल्या संपूर्ण उसासाठी एकूण २३६ कोटी ३० लाख रुपये सभासदांना अदा केले गेले आहेत.

गळीत हंगामात ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदारांना पंधरावडा बिलेही अदा करण्यात आली आहेत. यंदा कारखान्याने १०४ दिवसात ७,५६,२८५ टन उसाचे गाळप केले असून सरासरी साखर उतारा ११.३६ टक्के राहिला आहे. हा उतारा मागील दहा हंगामांच्या तुलनेत उच्चांक आहे. तथापि, या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे ऊस उत्पादनात घट झाली आणि गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही.

पुढील गळीत हंगामासाठी उसाची उपलब्धता वाढविण्यासाठी कारखान्याच्या संचालक मंडळाने १० मार्च २०२६ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत को-८६०३२ व एम.एस. १०००१ या दोन व्हरायटीची पाच फूट सरी पद्धतीने ऊस रोपे लागवडीस परवानगी दिली आहे. सभासदांनी रोपांची ५० टक्के रक्कम कारखान्याकडे भरावी, तर उर्वरित ५० टक्के रक्कम कारखाना तुर्त अदा करणार आहे. ही रक्कम गळीत झाल्यानंतर ऊस बिलातून कपात केली जाईल.

सदर रोपे लागवडीतून अधिक उत्पादन घेणाऱ्या प्रथम तीन सभासदांना बक्षीस देण्यात येणार आहे. या रोपांची लागवड केलेला ऊस फक्त आपल्या कारखान्याला गळीतास देणे बंधनकारक आहे. रोपे घ्यायच्या इच्छुक सभासदांनी कारखान्याच्या ऊस विकास विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष पृथ्वीराज जाचक व उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी केले.

यावेळी कारखान्याचे संचालक ॲड शरद जामदार, रामचंद्र निंबाळकर, शिवाजीराव निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतिश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, डॉ. योगेश पाटील, तानाजी शिंदे, सुचिता सपकळ, माधुरी राजपुरे आणि कार्यकारी संचालक अशोक जाधव व जनरल मॅनेजर हनुमंत करवर उपस्थित होते.

---

## आखाती युद्धाचा परिणाम; गॅस बुकिंग बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर दिसू लागला असून सध्या गॅस बुकिंग बंद करण्यात आले आहे. केवळ सुमारे १० टक्के सिलेंडर उपलब्ध होत असून ते अत्यावश्यक गरज असलेल्या ग्राहकांना वितरित केले जात असल्याची माहिती अविनाश गॅस एजन्सीचे बालाजी घोलप यांनी दिली. इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागासाठी इंडेन गॅस कंपनीचे वितरण अविनाश गॅस एजन्सीमार्फत केले जाते. या एजन्सीमार्फत सणसर, भवानीनगर व परिसरात घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरचे वितरण होते. सध्या एजन्सीमार्फत वितरण सुरू असले तरी आखाती देशांतील युद्धामुळे आणि सिलेंडरच्या तुटवड्यामुळे कंपनीकडून पूर्वीप्रमाणे गॅस बुकिंग घेतले जात नसल्याचे घोलप यांनी सांगितले.

युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण होईल या भीतीने ग्राहकांमध्ये घबराट पसरली आहे. गॅसची गाडी येताच भवानीनगरमध्ये सिलेंडर घेण्यासाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. अविनाश गॅस एजन्सीमार्फत दररोज साधारणपणे साडेचारशे ते पाचशे सिलेंडरचे वितरण केले जाते. मात्र सध्या तुटवड्यामुळे पुढील पाच दिवस केवळ दहा टक्के सिलेंडर उपलब्ध होणार असून ते मर्यादित प्रमाणात वाटप करण्यात येणार आहेत. विशाखापट्टणम येथून रेल्वेमार्गे गॅस सिलेंडरचा पुरवठा लवकरच येण्याची अपेक्षा असून त्यानंतर वितरण सुरळीत होईल, असेही त्यांनी सांगितले. ज्यांच्याकडे दुहेरी सिलेंडर असून एक भरलेला आहे अशा ग्राहकांना सध्या गॅस देण्यात येत नसून ज्यांना खरोखर गरज आहे अशा ग्राहकांनाच प्राधान्य दिले जात आहे.

गॅस सिलेंडरच्या तुटवड्याचा परिणाम हॉटेल व्यवसायावरही मोठ्या प्रमाणात होत आहे. शाकाहारी पदार्थ बनवण्यासाठी गॅसची गरज असते. सिलेंडर उपलब्ध नसल्यामुळे डिझेल भट्ट्यांचा वापर सुरू करावा लागत आहे.

---

## मंचर नगरपंचायतीची थकीत कर वसुलीसाठी विशेष मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** शहरातील मालमत्ता कर आणि पाणीपट्टीची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी मंचर नगरपंचायत प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील नागरिकांनी मालमत्ता कर व पाणीपट्टीचा भरणा वेळेत करून नगरपंचायतीस सहकार्य करावे, असे आवाहन नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी केले आहे.

मंचर शहरात एकूण १५ हजार ७८९ मालमत्ता असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची एकूण मागणी ७ कोटी ८५ लाख ६२ हजार रुपये आहे. यापैकी आतापर्यंत २ कोटी ५८ लाख १९ हजार रुपयांची वसुली झाली असून सुमारे ४ कोटी २१ लाख ४५ हजार रुपये वसूल करणे बाकी आहे. तसेच शहरात ५ हजार ६३३ नळ जोडण्या असून पाणीपट्टीची एकूण मागणी १ कोटी ५५ लाख ७१ हजार रुपये आहे. त्यापैकी ३४ लाख ४१ हजार रुपयांची वसुली झाली असून १ कोटी १७ लाख २९ हजार रुपये अद्याप बाकी आहेत.

थकीत कर वसुलीसाठी नगरपंचायतीकडून शहरातील सहा वॉर्डमध्ये प्रत्येकी चार कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून ते संबंधित मालमत्ताधारकांकडील थकीत व चालू कराची वसुली करत आहेत. मोठ्या थकबाकीदारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून आतापर्यंत १०० हून अधिक मालमत्ताधारकांना १५ दिवस मुदतीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. थकीत वसुली वाढविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून प्रत्येक विभागप्रमुखांना १५ लाख रुपये तर इतर कर्मचाऱ्यांना ५ लाख रुपयांचे वसुली उद्दिष्ट मार्चअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वॉर्डनिहाय थकबाकीदारांची नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांकासह सविस्तर यादी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आली असून प्रत्यक्ष संपर्क साधून वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, नोटीस देऊनही कराचा भरणा न करणाऱ्या थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्याचा निर्णय नगरपंचायत प्रशासनाने घेतला आहे. नियमांनुसार मालमत्ता जप्ती, सील करणे किंवा लिलाव करणे तसेच नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी आपला मालमत्ता कर व पाणीपट्टीचा भरणा तात्काळ करावा, असे आवाहन नगरपंचायतीकडून करण्यात आले आहे.

---

## मंदिरांच्या दानपेट्या फोडणारी टोळी जेरबंद

जुन्नर-आंबेगावातील आठ चोरीचे गुन्हे उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** भाविकांनी मंदिरातील दानपेटीत अर्पण केलेल्या रकमेवर डल्ला मारणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केली आहे. या कारवाईत जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील मंदिरांमध्ये झालेल्या चोरीचे आठ गुन्हे उघडकीस आले असून आरोपींकडून रोख रक्कम, चांदीच्या वस्तू आणि गुन्ह्यात वापरलेली साधने असा सुमारे १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शांताराम गोपाळा भुजबळ (वय ६७, रा. आळे, चिंचकाईमळा, ता. जुन्नर) यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. आळे गावातील श्री खंडोबा मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी फोडून रोख रक्कम तसेच सोन्याच्या व चांदीचा मुलामा असलेले दागिने असा सुमारे २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. या प्रकरणी भारतीय दंड संहिता २०२३ मधील कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मागील दोन महिन्यांत जुन्नर व आंबेगाव तालुक्यात मंदिर चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. आळे येथील श्री खंडोबा मंदिर, शिरोली बु. येथील श्री भैरवनाथ मंदिर, नारायणगाव येथील श्री साईबाबा मंदिर, नळवणे येथील श्री खंडोबा मंदिर, मंचर परिसरातील कळंबा माता मंदिर, जुन्नर धालेवाडी येथील श्री शिवशंभू मंदिर तसेच रांजणगाव गणपती परिसरातील श्री सोमेश्वर मंदिर येथील दानपेट्या फोडून रोख रक्कम व मौल्यवान वस्तू चोरीला गेल्या होत्या.

सध्या गावोगावी देव-देवतांच्या यात्रा आणि उत्सव सुरू असल्याने या चोरीच्या घटनांमुळे भाविक व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

मंदिर चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक नेमले. या पथकाने घटनास्थळांना भेट देत सीसीटीव्ही फुटेज, गुन्ह्याची कार्यपद्धती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान विविध ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये एकाच वर्णनाचे आरोपी दिसून आले.

त्यानंतर ३ मार्च २०२६ रोजी गोपनीय माहितीच्या आधारे पुणे-नाशिक महामार्गावरील कांदळी फाटा परिसरातून सुनील सुरेश आगिवले (वय २०, रा. कळस खुर्द, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) आणि भिमा भाऊसाहेब गिन्हे (वय २६, रा. नांदूर शिंगोटे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर; मूळ रा. कोतूळ, ता. अकोले) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी मंदिरातील दानपेट्या फोडून चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, रोख रक्कम तसेच चांदीच्या पादुका असा सुमारे १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे व धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महोदव शेलार तसेच पोलीस कर्मचारी दीपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले, राजू मोमीन, विक्रम तापकीर, हेमंत विरोळे, निलेश सुपेकर, समाधान नाईकनवरे आणि पोलीस हवालदार सुजाता कदम यांनी केली.

---

## परप्रांतीय तरुणांना नारळ खरेदी-विक्रीतून रोजगार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या नारळ हंगामाला सुरुवात झाली असून उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतील तरुण मोठ्या संख्येने तालुक्यात दाखल झाले आहेत. हे तरुण थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नारळ काढण्याचे काम करत असून शेतकऱ्यांकडून नारळ खरेदी करून स्थानिक बाजारपेठांमध्ये विक्री करत आहेत. या व्यवसायातून त्यांना चांगला रोजगार मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

मंचर, नारायणगाव, राजगुरुनगर, चाकण तसेच पुणे या प्रमुख बाजारपेठांमध्ये या नारळाची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात आहे. बाजारात नारळाला चांगला दर मिळत असल्याने परप्रांतीय तरुणांचा या व्यवसायाकडे कल वाढत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात अनेक शेतकऱ्यांच्या नारळाच्या बागा असून विविध जातींची नारळाची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. नारळाची झाडे उंच असल्याने त्यावरील नारळ काढणे हे कठीण काम असते. मात्र परप्रांतीय तरुण झाडावर चढून कौशल्याने नारळ काढत असल्याने शेतकऱ्यांची मोठी सोय होत आहे. अनेक शेतकऱ्यांकडे मजूर उपलब्ध नसल्याने नारळ काढणीचे काम रखडत होते. परंतु या तरुणांमुळे ही अडचण दूर झाली आहे.

हे तरुण झाडावरील नारळ काढून त्याच ठिकाणी मोजणी करतात आणि शेतकऱ्यांकडून रोखीने खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ पैसे मिळत आहेत.

दर हंगामात हे तरुण मोठ्या प्रमाणावर नारळ खरेदी करतात. एका दिवसात शेकडो नारळांची खरेदी-विक्री केली जाते. नारळ बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी छोट्या मालवाहू वाहनांचा वापर केला जातो.

नारळ विक्रीमुळे शेतकऱ्यांनाही चांगले अर्थार्जन होत असून बागायती शेतीला आधार मिळत आहे. स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी मर्यादित असताना परप्रांतीय तरुणांनी या कामातून स्वतःसाठी रोजगार निर्माण केला असून शेतकरी आणि बाजारपेठ यांच्यातील दुवा म्हणून ते काम करत आहेत. त्यामुळे आंबेगाव तालुक्यात नारळ व्यवसायाला चालना मिळत असून शेतकरी आणि परप्रांतीय तरुण या दोघांनाही या माध्यमातून आर्थिक फायदा होत असल्याचे दिसून येत आहे.

---

## धोकादायक पद्धतीने कडब्याची वाहतूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच जनावरांसाठी लागणाऱ्या कडब्याच्या खरेदीला वेग आला आहे. तालुक्यातील अनेक शेतकरी अहिल्यानगर जिल्ह्यासह इतर भागांतून मोठ्या प्रमाणावर कडबा खरेदी करत आहेत. मात्र खरेदी केलेल्या कडब्याची वाहतूक धोकादायक पद्धतीने होत असल्याने अपघाताचा धोका वाढल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

उन्हाळ्यात हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने शेतकरी आधीच जनावरांसाठी कडबा साठवून ठेवण्यावर भर देत आहेत. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह अन्य भागांतून कडब्याने भरलेले ट्रक व ट्रॅक्टर मोठ्या प्रमाणावर आंबेगाव तालुक्यात येत आहेत. काही शेतकरी थेट कडबा खरेदी करून तो आपल्या गावाकडे वाहून नेताना दिसत आहेत. मात्र, वाहतूक करताना अनेक ठिकाणी ट्रॅक्टरला एकाऐवजी दोन ट्रॉली जोडून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कडबा भरला जात आहे.

कडब्याचे उंच ढीग करून वाहतूक केल्याने वाहनाचे संतुलन बिघडण्याची शक्यता निर्माण होत आहे. विशेष म्हणजे ही वाहतूक अनेकदा रात्रीच्या वेळी केली जात असल्याने रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या इतर वाहनांसाठी ती अधिक धोकादायक ठरत आहे.

ग्रामीण भागातील अरुंद रस्ते, वळणांचे मार्ग आणि अंधारात उंच भरलेला कडबा यामुळे अपघाताचा धोका वाढत आहे.

काही ठिकाणी कडब्याचे ढीग रस्त्यावर पसरल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन करूनच कडब्याची वाहतूक करावी तसेच ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून कडबा वाहतूक करण्यावर संबंधित विभागाने नियंत्रण आणावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

जागतिक महिला दिन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधत

## ओम श्री साईराम शिक्षक प्रतिष्ठानतर्फे महिला सन्मान सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** नारायणगाव (ता. जुन्नर) येथील ताराई कृषी पर्यटन केंद्रात जागतिक महिला दिन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधत ओम श्री साईराम शिक्षक प्रतिष्ठानतर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे होते. यावेळी गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, नारायणगावच्या लोकनियुक्त सरपंच डॉ. शुभदा वाव्हळ, शिक्षण विस्तार अधिकारी अनिता शिंदे, डॉ. पल्लवी राऊत, डॉ. केतकी काचळे, सबनीस विद्यामंदिरच्या पर्यवेक्षिका अनुपमा पाटे, ॲड. भाग्यश्री नलावडे, महिला पोलीस सुमित्रा तळपे, आशा वर्कर अश्विनी वारुळे तसेच उद्योजिका अश्विनी कोल्हे आणि कावेरी कोल्हे यांचा फेटा बांधून, शाल, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला शिक्षक संघटनेचे महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख मंगेश मेहेर, जुन्नर तालुका अध्यक्ष रमाकांत कवडे, सानेगुरुजी कथामाला जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कानडे, तालुका शिक्षक पतसंस्थेचे सभापती सचिन मुळे, संचालक रवींद्र वाजगे, अंबादास वामन, जितेंद्र मोरे, केंद्रप्रमुख दिनेश मेहेर, प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष शरदराव शिंदे, सुरेश गडगे, रियाज मोमीन, सुनील हाडवळे, मनोहर वायकर, मनीषा कानडे आदी मान्यवर, प्रतिष्ठानचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शांताराम डोंगरे यांच्या 'बापू फेम होम मिनिस्टर' या मनोरंजनपर कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सुरेखा बटवाल, वैशाली फुलसुंदर, निर्मला मेहेर आणि वनिता गडगे यांनी विजेतेपद पटकावले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कमलाकांत मुंढे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे सचिव रुपेश पवार यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष उर्मिला वाजगे यांनी मानले.

---

## पीरसाहेब यात्रेत भाविकांची दर्शनासाठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** पुणे जिल्ह्यातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या वडगावपीर (ता. आंबेगाव) येथील श्री पीरसाहेब – हजरत दावल मलिक पीर दर्गा शरीफ यात्रेनिमित्त राज्यभरातून आलेल्या भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. यात्रेदरम्यान हिंदू आणि मुस्लिम भाविकांनी नवस फेडण्यासाठी दंडवत घालत भक्तिभावाने उपस्थिती लावली.

यात्रेच्या पहिल्या दिवशी बुधवारी (दि. ११) संदलचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

दुसऱ्या दिवशी गुरुवारी (दि. १२) भाविकांनी दंडवत घालत दर्शन घेतले तसेच शेरणी वाटप करण्यात आले.

अनेक हिंदू-मुस्लिम भाविकांनी नवस म्हणून फुलांची चादर, मलिदा व गोडभाताचा नैवेद्य अर्पण केला. तसेच शेरणी (गूळ) वाजतगाजत मिरवणूक काढून दरग्यात भक्तिभावाने अर्पण करण्यात आली.

या यात्रेसाठी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने मुस्लिम भाविक दाखल झाले होते.

यात्रेची व्यवस्था वडगावपीर, मांदळेवाडी येथील ग्रामस्थ, मुजावर जमात तसेच विविध तरुण मंडळांच्या कार्यकर्त्यांनी पाहिली.

पारगाव पोलिस ठाण्याच्या वतीने यात्रेदरम्यान चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, अशी माहिती ट्रस्टच्या वतीने हनिफ मुजावर यांनी दिली.

## सारांश वृत्त

### सिलिंडर टंचाईने इंदिरा कॅन्टिन बंद?

**बेंगळुरू:** कर्नाटकमध्ये एलपीजी पुरवठ्याच्या टंचाईमुळे शहरातील इंदिरा कॅन्टीन सुरू राहतील की नाही याबद्दल शंका निर्माण झाली आहे, असे महानगरपालिकेतील सूत्रांनी गुरुवारी सांगितले. इंदिरा कॅन्टीन हा कर्नाटक सरकारचा उपक्रम आहे, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी २०१३ ते २०१८ या त्यांच्या मागील कार्यकाळात तो सुरू केला होता. येथे पाच रुपयांत नाश्ता आणि दहा रुपयांत जेवण मिळते.

### तहसीलदाराला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक

**भुवनेश्वर** : ओडिशा दक्षता विभागाने गुरुवारी एका तहसीलदाराला त्याच्या ज्ञात उत्पन्नाच्या स्रोतांपेक्षा जास्त मालमत्ता बाळगल्याच्या आरोपाखाली अटक केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. कटक जिल्ह्यातील कांतापारा तहसीलदारांना बेहिशेबी मालमत्तेबद्दल विशेष न्यायाधीश, दक्षता यांच्या न्यायालयात पाठवले जाईल, असे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्याकडे बेहिशेबी मालमत्ता आढळून आली, ज्यामध्ये भुवनेश्वरमध्ये दोन बहुमजली इमारती आणि सात उच्च किमतीच्या भूखंडांचा समावेश आहे, असे विभागाने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### विषबाधा झाल्याने ३६ जण आजारी

**मेदिनीनगर (झारखंड)** : झारखंडच्या पलामू जिल्ह्यात गुरुवारी एका लग्न समारंभात संशयास्पद अन्नातून विषबाधा झाल्याने किमान ३६ जण आजारी पडले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. लेस्लीगंज पोलिस स्टेशन हद्दीतील बोहिता गावात झालेल्या लग्न समारंभात 'बुंदिया', साखरेचा तळलेला गोड पदार्थ खाल्ल्यानंतर पीडितांना उलट्या आणि जुलाब झाल्याची तक्रार करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. लग्न समारंभात किमान ३६ जणांना अतिसार झाला आहे. त्यांच्यावर लेस्लीगंज रुग्णालय आणि मेदिनीराय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सिव्हिल सर्जन यांनी सांगितले.

## हटवण्याच्या नोटिसीवर १९३ खासदारांच्या स्वाक्षऱ्या

# विरोधकांच्या रडारवर मुख्य निवडणूक आयुक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याची मागणी करणाऱ्या नोटिसांवर लोकसभेतील १३० आणि राज्यसभेतील ६३ अशा एकूण १९३ खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ही नोटीस शुक्रवारी संसदेच्या किमान एका सभागृहात सादर केली जाण्याची शक्यता असून ती नेमकी कोणत्या सभागृहात मांडली जाईल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

विरोधी पक्षातील एका नेत्याने सांगितले की, या नोटिसावर स्वाक्षरी करण्यासाठी खासदारांनी मोठा उत्साह दाखवला आहे. आवश्यक संख्येपेक्षा अधिक खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या असून गुरुवारीही अनेक खासदारांनी पुढाकार घेऊन नोटिसावर स्वाक्षरी केली.



नियमांनुसार, मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची मागणी करणाऱ्या प्रस्तावासाठी लोकसभेत किमान १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात, तर राज्यसभेत ही संख्या किमान ५० असावी लागते. या नोटिसावर सर्व विरोधी पक्षांच्या आघाडीतील सदस्यांनी स्वाक्षरी केल्याचे सूत्रांनी सांगितले. आम आदमी पक्षाचे काही खासदार, जे सध्या अधिकृतपणे त्या आघाडीचा भाग नाहीत, त्यांनीही नोटिसावर स्वाक्षरी केल्याचे समजते. मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची नोटीस देण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नोटिसामध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध सात आरोप नमूद करण्यात आले आहेत. यामध्ये कार्यालयात पक्षपाती आणि भेदभावपूर्ण वर्तन, निवडणूक घोटाळ्याच्या चौकशीत जाणूनबुजून अडथळा आणणे तसेच मोठ्या प्रमाणात मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणे अशा आरोपांचा समावेश आहे. विरोधी पक्षांनी यापूर्वीही मुख्य निवडणूक आयुक्तांवर सत्ताधारी पक्षाला मदत केल्याचा आरोप केला आहे. विशेषतः सध्या सुरू असलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रक्रियेवरून वाद निर्माण झाला असून त्याद्वारे काही मतदारांना वगळण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पश्चिम बंगालमधील या प्रक्रियेबाबत तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही चिंता व्यक्त केली असून निवडणूक आयोगावर खरे मतदार वगळल्याचा आरोप केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना हटवण्याच्या प्रक्रियेप्रमाणेच असते. केवळ सिद्ध झालेल्या गैरवर्तन किंवा अक्षमतेच्या आधारावरच महाभियोगाची प्रक्रिया राबवली जाऊ शकते.

संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात हा प्रस्ताव मांडला जाऊ शकतो. त्याला विशेष बहुमताची आवश्यकता असते, म्हणजेच सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमतासह उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने तो मंजूर व्हावा लागतो.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त नियुक्ती कायद्यानुसार, मुख्य निवडणूक आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच आणि तत्सम कारणांशिवाय पदावरून हटवता येत नाही.

न्यायाधीश (चौकशी) कायदा १९६८ नुसार, संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्ताव स्वीकारल्यानंतरच चौकशी समिती स्थापन केली जाते. दोन्ही सभागृहांत प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सभापती आणि लोकसभा अध्यक्ष संयुक्तपणे चौकशी समितीची स्थापना करतात.

## भारताचा कच्च्या तेलाचा पुरवठा सुरक्षित : हरदीप सिंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाज वाहतुकीत व्यत्यय निर्माण झाला असला, तरी भारतातील कच्च्या तेलाचा पुरवठा सुरक्षित असल्याचे केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना पुरी म्हणाले की, ऊर्जा क्षेत्राच्या इतिहासात जगाने यापूर्वी कधीही असा प्रसंग पाहिलेला नाही. इतिहासात पहिल्यांदाच होर्मुझची सामुद्रधुनी व्यावसायिक जहाज वाहतुकीसाठी प्रभावीपणे बंद झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष निर्माण करण्यात भारताची कोणतीही भूमिका नसली, तरी त्याचे परिणाम भारताला भोगावे लागत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

पुरी म्हणाले की, देशातील रिफायनऱ्या सध्या उच्च क्षमतेने कार्यरत आहेत. अनेक ठिकाणी त्या १०० टक्क्यांहून अधिक क्षमतेने चालू आहेत. पेट्रोल, डिझेल, रॉकेल, विमानचालन टर्बाइन इंधन (एटीएफ) तसेच इंधन तेलाचा कोणताही तुटवडा नाही. या सर्व इंधनांची उपलब्धता पूर्णपणे सुनिश्चित करण्यात आली आहे.

भारताने गेल्या काही वर्षांत कच्च्या तेलाच्या आयातीचे स्रोत मोठ्या प्रमाणात विविध केले असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येणाऱ्या जहाजांवरचे अवलंबित्व कमी झाले आहे. सध्या भारत ४० देशांकडून कच्चे तेल आयात करतो, तर २००६-०७ मध्ये ही संख्या २७ होती. या विविधतेमुळे भारताला इतर अनेक देशांपेक्षा अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत. देशभरातील पेट्रोल पंपांवर पुरेसा साठा उपलब्ध असून इंधन पुरवठ्याची साखळी सुरळीतपणे कार्यरत असल्याचेही पुरी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या राजनैतिक संपर्कांमुळे भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या अडचणी असूनही आवश्यक तेवढा कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध झाला असल्याचेही त्यांनी सांगितले.

## जयशंकर-इराण परराष्ट्र मंत्र्यांत तीनदा चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** प्रादेशिक तणावाच्या पार्श्वभूमीवर जहाज वाहतुकीची सुरक्षितता आणि भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या मुद्द्यांवर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी अलिकडच्या काळात तीन वेळा चर्चा केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, दोन्ही नेत्यांमधील अलीकडील चर्चेत सागरी सुरक्षा आणि ऊर्जा पुरवठ्याशी संबंधित मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

जयस्वाल म्हणाले, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री यांच्यात अलिकडच्या काळात तीन वेळा चर्चा झाली आहे. शेवटच्या चर्चेत जहाजांच्या सुरक्षिततेसह भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. यापलीकडे सध्या अधिक माहिती देणे अकाली ठरेल. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारताला तेल निर्यात करण्यास परवानगी दिल्याच्या वृत्तांबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना जयस्वाल यांनी सांगितले की, या संदर्भात अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. सामुद्रधुनीतून दोन जहाजे गेल्याच्या वृत्तांबाबतही सध्या ठोस माहिती नसून सरकारकडून संध्याकाळपर्यंत अधिक तपशील दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना मदत करण्यासाठी भारत सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. सुमारे ९,००० भारतीय नागरिक इराणमध्ये असून त्यापैकी अनेक भारतीय नागरिक, विशेषत: विद्यार्थी, सुरक्षितपणे भारतात परतले आहेत.

तेहरानमध्ये राहणाऱ्या अनेक भारतीय नागरिकांना देशातील इतर सुरक्षित शहरांमध्ये हलवण्यात आले आहे. अझरबैजान आणि आर्मेनियाच्या सीमेवरून देश सोडून व्यावसायिक विमानांद्वारे भारतात परतू इच्छिणाऱ्या नागरिकांनाही मदत केली जात आहे.

## 'क्रीमी लेयर' ठरवताना उत्पन्न हा निकष पुरेसा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वपूर्ण निर्णय दिला. उमेदवार क्रीमी लेयरमध्ये मोडतो की नाही हे केवळ कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारावर ठरवता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणाची सुनावणी करताना खंडपीठाने नमूद केले की, पदांची श्रेणी आणि दर्जा या निकषांचा विचार न करता फक्त उत्पन्नाच्या आधारावर क्रीमी लेयरचा दर्जा निश्चित करणे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही.



न्यायालयाच्या मते, उत्पन्नाबरोबरच संबंधित व्यक्तीची सामाजिक आणि व्यावसायिक स्थितीही विचारात घेणे आवश्यक आहे.

क्रीमी लेयर ही संकल्पना ओबीसी समाजातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत झालेल्या घटकांसाठी वापरली जाते. आरक्षणाचा लाभ खरोखर गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचावा, यासाठी या वर्गाला आरक्षणातून वगळण्यात आले आहे. ही संकल्पना १९९२ मधील इंद्रा साहनी विरुद्ध भारतीय संघराज्य या ऐतिहासिक खटल्यानंतर अस्तित्वात आली. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला मान्यता दिली होती, मात्र आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांना त्यातून वगळण्याचा निर्देश दिला होता. त्यानंतर १९९३ मध्ये सरकारने यासाठी नियम लागू केले.

सध्याच्या नियमांनुसार, वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या ओबीसी कुटुंबांना क्रीमी लेयरमध्ये समाविष्ट केले जाते. अशा उमेदवारांना सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमधील आरक्षणाचा लाभ मिळत नाही. ही उत्पन्न मर्यादा २०१७ मध्ये ६ लाख रुपयांवरून ८ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली होती. उत्पन्नाशिवाय उच्च संवैधानिक पदांवरील व्यक्ती, वरिष्ठ सरकारी अधिकारी, सशस्त्र दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच मोठे व्यावसायिक यांच्या मुलांनाही क्रीमी लेयर श्रेणीत समाविष्ट केले जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे १९९३ मधील क्रीमी लेयर ओळखण्याच्या नियमांचा पुनर्विचार करण्यासाठी केंद्र सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. केवळ आर्थिक निकषांवर अवलंबून राहिल्यास सामाजिक न्यायाच्या व्यापक उद्दिष्टांना बाधा येऊ शकते, असेही न्यायालयाने सूचित केले.

## मेघालयात बीएसएफ अधिकाऱ्यांच्या ताफ्यावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तुरा :** ईशान्येकडील मणिपूरमध्ये परिस्थिती काहीशी शांत होत असतानाच मेघालयातील गारो हिल्स प्रदेशात हिंसाचार उसळला आहे. बुधवारी संध्याकाळी अज्ञात हल्लेखोरांनी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांवर हल्ला केला असून या घटनेत अनेक जवान जखमी झाले. बीएसएफच्या डीआयजी यांच्या ताफ्यातील एका वाहनालाही आग लावण्यात आली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत-बांगलादेश सीमेजवळील पश्चिम गारो हिल्स जिल्ह्यातील तुरा शहरात ही घटना घडली. उपमहानिरीक्षक (डीआयजी) इतर अधिकाऱ्यांसोबत बैठकीवरून परतत असताना त्यांच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आला. या घटनेत डीआयजी आणि काही अधिकारी किरकोळ जखमी झाले असून ताफ्यातील एका वाहनाला जमावाने आग लावली.

गारो हिल्स ऑटोनॉमस डिस्ट्रिक्ट कौन्सिल निवडणुकीच्या मुद्द्यावरून हा हिंसाचार भडकला. निवडणुकीच्या नामांकन प्रक्रियेत गैर-गारो समुदायांच्या सहभागाला विरोध करणाऱ्या गटांनी आंदोलन सुरू केले होते. मंगळवारी चिबिनांग परिसरात जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला होता. त्या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले.

हिंसाचारानंतर गारो हिल्स प्रदेशातील अनेक भागांत जाळपोळ आणि मालमत्तेची तोडफोड झाल्याचे वृत्त आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पाच लष्करी तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. त्यापैकी तीन तुरा येथे तर दोन चिबिनांग भागात तैनात आहेत. परिस्थिती गंभीर होताच मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी १० एप्रिल रोजी होणाऱ्या जीएचएडीसी निवडणुका पुढे ढकलण्याची घोषणा केली आहे.

## पश्चिम बंगाल विधानसभा

# दोन टप्प्यांत निवडणुका?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील २९४ विधानसभा जागांसाठी पुढील महिन्यापासून दोन टप्प्यात निवडणुका होण्याची शक्यता असल्याची माहिती निवडणूक आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. निवडणूक आयोगाच्या नवी दिल्ली कार्यालयात होणाऱ्या बैठकींच्या दुसऱ्या फेरीनंतर अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अधिकाऱ्यांच्या मते, कोलकाता येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासोबत झालेल्या अलीकडील बैठकीत राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस वगळता बहुतांश राजकीय पक्षांनी एक किंवा दोन टप्प्यांत निवडणुका घेण्याची मागणी केली होती. सुरक्षा दलांसह अन्य अधिकाऱ्यांकडूनही अशाच सूचना मिळाल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन टप्प्यांत निवडणुका घेतल्यास निवडणुकीदरम्यान होणाऱ्या हिंसाचारावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले. त्यामुळे दंगलखोरांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन



अशांतता निर्माण करण्याची संधी कमी मिळेल. अंतिम निर्णय घेताना या बाबींचाही विचार केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एकाच टप्प्यात मतदान होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. २०२४ मध्ये महाराष्ट्रातील २८८ विधानसभा जागांसाठी निवडणुका एकाच टप्प्यात घेण्यात आल्या होत्या. पश्चिम बंगालमध्येही एकाच टप्प्यात निवडणूक घेणे अशक्य नसले तरी सध्याच्या परिस्थितीत ते अत्यंत कठीण असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणुकीदरम्यान पश्चिम बंगालमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हा निवडणूक आयोगासाठी महत्त्वाचा मुद्दा असल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले. राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मतदानपूर्व आणि मतदानोत्तर काळात कडक देखरेख ठेवण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## कोणालाही कधीही बोलण्याचा अधिकार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्याचा ठराव फेटाळल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांनी सभागृहाच्या कामकाजाबाबत स्पष्ट भूमिका मांडली. लोकसभा ठरलेल्या नियम आणि कार्यपद्धतीनुसारच चालते आणि कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही विषयावर बोलण्याचा अधिकार नसतो, असे त्यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

अध्यक्षपद हे कोणत्याही व्यक्तीचे नसून ते सभागृहाच्या प्रतिष्ठेचे प्रतीक असल्याचे सांगत बिर्ला म्हणाले की, लोकसभा नेहमीच ठरलेल्या नियमांनुसार चालेल. कोणाला ते मान्य असो वा नसो, सभागृहाचे कामकाज नियमांनुसारच होईल आणि आपण ते प्रामाणिकपणे व निष्पक्षपणे चालवू, असे त्यांनी अधोरेखित केले. चर्चेदरम्यान सभागृहातील सदस्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार मानले. त्यांच्या बाजूने आणि विरोधात बोलणाऱ्या सर्व सदस्यांचेही त्यांनी आभार व्यक्त केले.

बिर्ला म्हणाले की, सभागृहातील प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार असला तरी तो नियम आणि कायद्यांच्या चौकटीतच असतो. पंतप्रधान किंवा कोणताही मंत्रीदेखील अध्यक्षांच्या परवानगीशिवाय बोलू शकत नाही. अध्यक्ष परवानगी देतील तेव्हाच सदस्य बोलू शकतात. काही सदस्यांचे मायक्रोफोन बंद केले जातात, या आरोपांवरही त्यांनी स्पष्टीकरण दिले. आपल्या हातात मायक्रोफोन चालू किंवा बंद करण्यासाठी कोणताही स्विच नसून अध्यक्ष सदस्याला बोलण्याची परवानगी दिल्यावरच मायक्रोफोन सुरू केला जातो, असे त्यांनी सांगितले.

१३ फेब्रुवारीला संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात १० फेब्रुवारी रोजी विरोधकांनी बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वासाची सूचना दिली होती. त्यानंतर गुरुवारी ते पहिल्यांदाच सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी आले.

बिर्ला यांनी भूतकाळातील उदाहरणे देत अध्यक्षांच्या परवानगीशिवाय कोणालाही कागदपत्रे सादर करण्याची किंवा बोलण्याची मुभा नसल्याचे स्पष्ट केले.

### अब्दुल्ला यांच्या हत्येचा प्रयत्न चर्चेत

**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्या हत्येच्या प्रयत्नाचा मुद्दा गुरुवारी राज्यसभेत चर्चेत आला, विरोधी पक्षांनी या घटनेसाठी राज्याचा दर्जा रद्द करण्याला जबाबदार धरले, तर केंद्राने व्यापक चौकशीचे आश्वासन दिले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी कामकाजादरम्यान हा मुद्दा उपस्थित केला जम्मू आणि काश्मीरचा राज्याचा दर्जा रद्द करण्यात आल्यामुळे त्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे, असे ते म्हणाले.

## जहाजांच्या सुरक्षेवर चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या तीव्र लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम आशियातील सध्याची परिस्थिती आणि व्यापारी जहाजांच्या सुरक्षेबाबत दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर संयुक्त लष्करी हल्ला केल्यानंतर जयशंकर आणि अराघची यांच्यात झालेली ही तिसरी चर्चा असल्याचे सांगितले जाते. या संभाषणात अराघची



यांनी विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी आणि पर्शियन आखातातील सागरी सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. इराणने या प्रदेशातील जहाजवाहतूक आणि सागरी व्यापारासाठी निर्माण झालेली असुरक्षित परिस्थिती ही अमेरिका आणि इस्रायलच्या आक्रमक कारवायांचा थेट परिणाम असल्याचा आरोप केला. तसेच सागरी सुरक्षेच्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय समुदायाने अमेरिकेला जबाबदार धरण्याचे आवाहनही इराणने केले आहे.

## तेल आणि वायूच्या किमतींमध्ये मोठी वाढ

# मध्यपूर्वेतील तणावामुळे आशियात इंधन टंचाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेतील तणाव वाढला असून तेल आणि वायूच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर भारतासह अनेक आशियाई देशांनी ऊर्जा बचत करण्यासाठी आणि आर्थिक परिणाम कमी करण्यासाठी आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, आशिया आपल्या एकूण तेल गरजांपैकी सुमारे ६० टक्के तेल मध्यपूर्वेतून आयात करतो. त्यामुळे ऊर्जा बाजारातील चढ-उतारांचा या प्रदेशावर मोठा परिणाम होत आहे.



भारताने संभाव्य इंधन संकटाचा सामना करण्यासाठी काही कठोर पावले उचलली आहेत. यामध्ये धोरणात्मक तेल साठ्यांचा वापर, रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवणे आणि देशातील रिफायनरीजना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश देणे यांचा समावेश आहे. सरकार साठेबाजी रोखण्यासाठी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत असून पर्यायी पुरवठा मार्गांचा शोध घेत आहे. तसेच किरकोळ इंधन दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

घरगुती ग्राहकांना गॅसचा तुटवडा जाणवू नये म्हणून एलपीजीचा औद्योगिक वापर कमी करून तो घरगुती वापराकडे वळवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. एलपीजीचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्य सरकारांना देखरेख वाढवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, शेजारील बांगलादेशमध्येही इंधन संकट तीव्र झाले आहे. देशाच्या सुमारे ९५ टक्के ऊर्जा गरजा आयातीवर अवलंबून असल्याने जागतिक पुरवठा खंडित झाल्याचा थेट परिणाम तिथे जाणवत आहे. पेट्रोल पंपांवर लांब रांगा लागल्या असून ऊर्जा बचतीसाठी अनेक विद्यापीठे तात्पुरती बंद करण्यात आली आहेत. या परिस्थितीत भारताने "नेबरहूड फर्स्ट" धोरणांतर्गत पाइपलाइनद्वारे ५,००० टन डिझेलची पहिली खेप बांगलादेशला पाठवली आहे.

पाकिस्ताननेही ऊर्जा बचतीसाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. सरकारी वाहनांसाठी इंधन वापर ५० टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे. सरकारी कार्यालयांमध्ये चार दिवसांचा कामाचा आठवडा लागू करण्यात आला असून ५० टक्के कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शाळा दोन आठवड्यांसाठी बंद करण्यात आल्या आहेत आणि अनावश्यक सरकारी कार्यक्रमांवरही बंदी घालण्यात आली आहे. मंत्री आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवरही निर्बंध घालण्यात आले आहेत.

चीननेही आपल्या मोठ्या धोरणात्मक तेल साठ्यांचा वापर सुरू केला असून हे साठे १०० दिवसांहून अधिक काळाच्या गरजा पूर्ण करू शकतात. तसेच चीनने कच्च्या तेलाची आयात वाढवली असून इंधन निर्यात तात्पुरती थांबवली आहे. अक्षय ऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढवण्याच्या योजनांनाही गती देण्यात आली आहे.

दक्षिण कोरियाने सुमारे ३० वर्षांनंतर प्रथमच इंधनाच्या किमतींवर मर्यादा लादण्याचा निर्णय घेतला आहे. थायलंडने सरकारी कर्मचाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध घातले असून काही ठिकाणी घरून काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत.